7:58 PM

कृषि उत्पन्न बाजार समित्यांमधील
शेतमालाचे व्यवहार सुरु ठेवणेबाबत.

पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
नविन मध्यवर्ती इमारत, ३ रा मजला, पुणे
Ph No- ०२०- २६१२६६२८/२६१२३९८५
Gmail- dirmktms@gmail.com Website- mahapanan.maharashtra.gov.in

---

**तात्काळ/महत्वाचे**

जा.क्र.पणन-५/ परिपत्रक / सन २०२० दिनांक:- १९ /०३/ २०२० 1007/

## परिपत्रक

या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पणन-५/परिपत्रक/९७४/ दि.१६/३/२०२० अन्वये कोरोना रोगाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी सर्व बाजार समित्यांनी उचित उपाययोजना करणे बाबत परिपत्रकीय सुचना निर्गमित केल्या आहेत. त्याप्रमाणे कोरोना रोगाचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी सर्व बाजार समित्यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. तथापि बाजार समित्यांच्या आवारामध्ये आवक होणारा अन्नधान्य, कडधान्य, फळे, भाजीपाला इ. शेतमाल हा जीवनावश्यक वस्तूंचा भाग आहे. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा विशेषत: गहू, ज्वारी, तांदुळ, तुरडाळ, हरभराडाळ, कांदा, बटाटा, लसून इत्यादिचा व्यापार ग्राहकांच्या दृष्टीने सुरळीत चालू रहाणे अत्यंत आवश्यक आहे आणि शेतक-यांनाही शेतमाल विक्रीमध्ये कोणत्याही प्रकारे अडचण येणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने सर्व बाजार समित्यांना कळविण्यात येते की, बाजार समितीचे मुख्य बाजार आणि उपबाजार नियमितपणे सुरु ठेवण्यात यावेत जेणेकरुन शेतक-यांना माल विक्रीमध्ये कोणतीही अडचण येणार नाही व ग्राहकांनाही मालाचा सुरळीत पुरवठा होत राहील.

बाजार समित्यांना बाजार आवारामध्ये स्वच्छता ठेवणे आवश्यक आहे. परंतू त्यासाठी बाजार बंद ठेवणे उचित नाही. बाजार समित्यांनी बाजार आवाराची स्वच्छता शक्यतो रात्रीच्या वेळी किंवा बाजार वेळ संपल्यानंतर करण्यात यावी.

सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनीही त्यांचे जिल्हयातील सर्व बाजार समित्यांचे कामकाज सुरळीत चालू राहील असे पहावे, तसेच बाजारात उपरोक्त नमूद जीवनावश्यक शेतमालाच्या आवकेबाबत दैनंदिन आढावा घ्यावा आणि शेतक-यांना शेतमाल विक्री करण्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही आणि जीवनावश्यक वस्तुचा पुरवठा सुरळीत राहील याकडे गांभिर्याने लक्ष दयावे.

(सुनिल पवार)
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत : आवश्यक त्या कार्यवाहीसाठी .**

१. सभापती/ सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व )
३. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व )

(कृ.मा.प.)

**प्रत माहितीस्तव :-**

१. मा.विभागीय आयुक्त, (सर्व )
२. मा. जिल्हाधिकारी, (सर्व )
३. कार्यकारी संचालक , महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ,पुणे
४. मा.मंत्री, सहकार व पणन यांचे खाजगी सचिव .

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:-**

१. मा.प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे